


दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ७१ वा ▶ सोमवार दि.१५ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### कारच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**धुळे ।** निमगूळ (ता. शिंदखेडा) गावाजवळ भरधाव कारने दुचाकीस धडक दिली. या अपघातात दुचाकीवर मागे बसलेला तरुण गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावला. हर्शल पांडुरंग बागल ( रा. निमगूळ, ह.मु. धनकवडी, (पुणे) यांच्या फिर्यादीनुसार २ जानेवारीला दुपारी साडेचारच्या सुमारास निमगूळ गावाजवळ भरधाव कार (एमएच १८, बीसी २५०७) ने दुचाकी (एमएच १८, एचएस २५१४) ला जोरदार धडक दिली.

### एकास दमबाजी; तिघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** शहरातील चाळीसगाव रोडवर भांडण सोडविण्याच्या रागातून तिघांनी एकास दमबाजी केली. तसेच एकाने पिस्तूल रोखून बटण दाबले. मात्र पिस्तुलामधून गोळी न निघाल्याने तरुण बचावला. या प्रकरणी तिघांवर मोहाडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. याबाबत जतीन ऊर्फ अजय श्रीधर अव्हाळे रोहित थोरात, परशुराम परदेशी व दिनेश रिक्षावाला यांनी घराजवळील मारुती मंदिराजवळ बोलावले. तेथे वाद झाल्यानंतर परशुराम परदेशी याने पिस्तूल कंबरेला रोखून धरत ठार करण्याची धमकी दिली. पिस्तूल रोखून बटण दाबले. मात्र, त्यातून गोळी निघाली नाही. त्यावरून गुन्हा नोंद झाला.

# पत्रकार संघाचा शानदार पदग्रहण-पुरस्कार सोहळा संपन्न

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकार्याचा पदग्रहण समारंभ आणि सर्वोत्कृष्ट पत्रकारांसह विविध क्षेत्रांतील रत्नांचा सन्मान सोहळा रविवारी १४ जानेवारीला रोजी आयोजित करण्यात आला होता.

पत्रकारितेच्या माध्यमातून धुळे जिल्ह्याच्या विकासाला प्रबोधनात्मक दिशा देणार्या सर्व श्रेष्ठ पत्रकारांसह खान्देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या मान्यवरांचा विशेष पुरस्काराने यथोचित सन्मान आणि सत्कार करण्यात आला. यात माहिती व जनसंपर्क संचालक महाराष्ट्र राज्य हेमराज बागूल, मंत्री अब्दुल सत्तार यांचे ओएसडी नरेंद्र (बंडूनाना) कुळकर्णी, ज्येष्ठ पत्रकार विवेक भावसार, झेप मराठीचे संस्थापक संचालक अनिल चव्हाण, युवा उद्योजक चेतन मंडोरे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र इंगळे यांना पुरस्कराने सन्मानित करण्यात आले. तर अनुप अग्रवाल, इर्शादभाई जहागीरदार, ॲड. मुधकर भिसे, विजय टाटीया, डॉ. सुशील महाजन, संदीप महाले, हिलाल माळी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मनोज गर्दे, शहर उपाध्यक्ष अतुल पाटील, ग्रामीण उपाध्यक्ष अरूण धोबी, सरचिटणीस सचिन बागूल, कोशाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ यांच्यासह सर्व नूतन कार्यकारिणी सदस्य, स्वीकृत सदस्य यांचे पदग्रहण या वेळी संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रिय संरक्षण राज्यमंत्री तथा खासदार डॉ. सुभाष भामरे, आमदार कुणाल पाटील, आमदार मंजुळा गावित, आमदार काशिराम पावरा, पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, माजी महापौर जयश्री अहिराव, माजी महापौर प्रदीप कर्पे,रवींद्र नामदेव इंगळे, मिलींद अवचित बैसाणे, चंद्रशेखर आत्माराम पाटील, ओमप्रकाश गुलाबचंद शर्मा, नुरखान नवाजखान पठाण, सिध्दार्थ संतोष पारेराव, सुनील भगवान पाटील आदी उपस्थित होते.

**आजचा दिवस पत्रकारांसाठी आनंदाचा**

**धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे काम घटनेला धरुन सुरु आहे. संघाला आज आठवा अध्यक्ष मिळाला आहे. तसेच आता फोटोग्राफर साठी विमा काढला जाणार आहे.नवीन पत्रकारांसाठी प्रबोधन करणार आहोत. असे देखील संघाचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले.**





**प्रिंट मिडियावर विश्वास टिकून : खासदार सुभाष भामरे**

**पत्रकार देखील खासदार होऊ शकते. तसेच अलीकडे सोशल मीडिया प्रभाव असला तरी आजही प्रिंट मिडियावर विश्वास टिकवून आहे. असे देखील खासदार सुभाष भामरे यांनी सांगितले.**

**वृत्तपत्रे सामान्य माणसाला न्याय देण्याचे काम करतात : शरद पाटील**

**वृत्तपत्रे सामन्य माणसाला न्याय देण्याचे काम करत आहे.तर आज पर्यंत तीन पत्रकार आमदार झाले आहेत. तर मी देखील पंधरा वर्षे पत्रकार म्हणून काम केले. असे देखील शरद पाटील यांनी सांगितले.**

## इंडिया आघाडी नव्हे ही तर घमंडीया आघाडी

**केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवारांची टिका**

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

२२ जानेवारी रोजी अयोध्येतील राम मंदिरात प्रभू रामाच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला काँग्रेस सह इंडिया आघाडीच्या काही घटक पक्षांनी येण्यास नकार दिला आहे. ही इंडिया आघाडी नाही तर घमंडीया आघाडी असल्याची टीका केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केली.



आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीकडून तयारीला सुरुवात करण्यात आली आहे. आज राज्यभरातील सर्वच जिल्ह्यात महायुतीचे मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. नाशिकमधील महायुतीच्या मेळाव्यात त्यांनी इंडिया आघाडीला डिवचलं आहे. मेळाव्यात मार्गदर्शन करताना डॉ. भारती पवार म्हणाल्या की, सोशल मिडियावर कोणी लक्ष्य करत असेल तर त्यालाही आपण उत्तर द्यायला तयार असले पाहिजे. कांदा किंवा शेतकरी प्रश्नावर कोणी कमी पडलेले नाही. चिंता सगळ्यांनाच आहे. आम्ही वेळोवेळी प्रश्न्न मांडत असतो. पहिल्यांदाच कांद्याला अनुदान देणारे आपले सरकार आहे हे बोललेच पाहिजे. कुठेतरी आपण हे मांडायला कमी पडतोय का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

## एकनाथ शिंदेंच्या माध्यमातून नरेंद्र मोदींचे हात बळकट करायचेत

**मिलिंद देवरांचं वक्तव्य**

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आजचा दिवस माझ्यासाठी भावनिक आहे. मी खूप भावूक आहे, मी काँग्रेस सोडेन असं कधीच वाटलं नव्हतं. आज माझ्या कुटुंबाचे काँग्रेस पक्षाशी ५५ वर्षांचे जुने नाते शिंदे साहेबांच्या नेतृत्त्वाखाली संपवत आहे, असं मिलिंद देवरा म्हणाले.

आपल्या सर्वांना माहिती आहे की माझं राजकारण, सकारात्मक, रचनात्मक,





विकासात्मक राहिलेलं आहे. माझी विचारधारा सर्वसामान्य लोकांची सेवा करणं हे आहे. मुंबई आणि महाराष्ट्रासाठी त्यांचे ध्येय मोठं आहे. त्यासाठी आज त्यांचे हात बळकट करायचे आहेत. नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्याकडे मोठं व्हिजन आहे. शिवसेनेच्या माध्यमातून त्यांचे हात बळकट करायचे आहेत. माझं शिवसेनेशी नातं जुनं आहे. बाळासाहेब ठाकरेंच्या आशीर्वादानं माझे वडील मुरली देवरा महापौर बनले, असं मिलिंद देवरा म्हणाले. एकनाथ शिंदे त्यांच्या मेहनतीनं वर्षा बंगल्यापर्यंत आले आहेत. राजकारणात जनसेवा आणि लोकसेवा ही एक विचारधारा आहे.माझ्यावर चुकीचे आरोप होण्याआधी एकनाथ शिंदेंनी शिवसेना पक्षात प्रवेशाचं आमंत्रण दिलं. शिंदेसाहेबांना महाराष्ट्रासाठी मुंबईसाठी काम करणारी प्रामाणिक मत आहे. खासदार होऊन मी चांगलं काम करु शकतो, असं मत शिंदे यांचं आहे, त्यासाठी त्यांचे आभार मानतो, असं मिलिंद देवरा म्हणाले.

## सकाळी उठायचं अन् टीव्हीसमोर वाकडी मान करायची अरे तुम्हाला गल्लीत तरी कोणी विचारते का?

**दादा भुसेंचा संजय राऊतांवर हल्लाबोल**

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

काही लोक रोज सकाळी ८-९ ला उठले की, टिव्हीसमोर येणार वाकडी मान करणार, आंतरराष्ट्रीय स्तरावर बोलणार, अरे तुम्हाला गल्लीत तरी कोणी विचारते का? कोणाचे रेशन कार्ड तरी काढून दिले का तुम्ही? अशा शब्दात कृषीमंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री दादा भूसे यांनी शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यावर तोफ डागली आहे.



नाशिकमध्ये आज आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर महायुतीचा मेळावा होत आहे. या मेळाव्यात बोलताना दादा भुसे यांनी संजय राऊत यांच्यावर कडाडून हल्ला चढवला. ते म्हणाले की, टीव्हीवर फक्त चमकोगिरी करणार, आता याकडे आपण दुर्लक्ष करायला पाहिजे. दादा भूसे म्हणाले की, मोदी साहेबांसमोर कोणी आहे का? दुसरं कोणी दिसत पण नाही. मोदींना आपल्याला पुन्हा पंतप्रधान करायचे आहे. मी स्वतः उमेदवार असे समजून काम करा. युवा महोत्सवात मोदीजी येऊन, सर्वांनी जबाबदाऱ्या चोख पार पाडल्या त्याबद्दल आभार मानतो. यावेळी बोलताना भूसे यांनी आरपीआयच्या प्रकाश लोंढेच्या टीकेला उत्तर दिले. लोंढे साहेब काही घरातल्या गोष्टी आपण घरातच बोलू शकतो, असे ते म्हणाले.

माझ्याकडे अजितदादांचे घड्याळ आहे. आम्ही दहाचा कार्यक्रम असताना, दहा वाजून दहा मिनिटांनी आलो. ४५ खासदार का? ४८ पैकी ४८ का नको? उरलेले तीन धाकधूक होतील. आपण सर्व खासदार निवडून आणले पाहिजे. आता फक्त लोकसभा आणि लोकसभाच असेही झिरवळ यांनी नमूद केले.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**धुळे ।** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी २५ जानेवारी, २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल.

## धुळ्यात नायलॉन मांजा आढळल्यास कारवाई

**मनपा आयुक्तांचा इशारा**

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरात नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक अथवा वापर आढळून आल्यास संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई केली जाईल असा इशारा धुळे महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी दिला.

विशेषतः मकर संक्रांती सणानिमित्त सर्वत्र पंतगोत्सवदेखील पाहायला मिळतो. यंदाही सध्या बच्चे कंपनी पतंग उडवताना दिसतात. पतंग उडविण्यासाठी विशेषतः बच्चे कंपनीत एक वेगळा उत्साह, मज्जा पाहायला मिळते. आकाशात उंच भरारी घेणाऱ्या पंतगासोबतच इतरांच्या पतंगांचा मांजा कापण्यात व नंतर हा मांजा लुटण्याचाही त्यांना एक वेगळा आनंद असतो.



पतंगोत्सवादरम्यान मात्र एखादी दुर्घटना झाल्यास आनंदावर विरजण पडते. इतर कुणाला इजा पोचते. विशेषतः नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राण्यांसह माणसांनाही गंभीर इजा होण्याची शक्यता असते. दरवर्षी कुठे ना कुठे अशा घटना समोर येतात. त्यामुळे नायलॉन मांजाचा वापर टाळण्याचे शासकीय यंत्रणेकडून आवाहन केले जाते. नायलॉन मांजा विक्री, वापर, साठवणुकीवर शासनाने बंदीच घातल्याने कारवाई देखील होते. तरीही अनेक ठिकाणी या नायलॉन मांजाचा वापर होतो.

## अवैध नळजोडणी केल्यास गुन्हे दाखल करणार

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महापालिका पाणीपुरवठा विभागातर्फे आयुक्त अमिता दगडे-पाटील यांच्या आदेशाने शहरातील मुख्य जलवाहिन्यांवरील अवैध नळ जोडण्या खंडित करण्याची मोहीम हाती घेतली आहे. चार ते पाच अवैध नळजोडण्या खंडित करण्यात आल्या. दरम्यान, अशाप्रकारे अवैध नळजोडण्या घेतल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल केले जातील असा इशारा मनपा पाणीपुरवठा विभागातर्फे देण्यात आला आहे. धुळे शहरात अनियमित पाणीपुरवठ्याची समस्या सर्वश्रुत आहे. विविध तांत्रिक अडचणींमुळे शहरवासीयांना सुरळीत पाणी देताना यंत्रणेची दमछाक होते.

## भुजबळांना मंत्री पदावरून हटवून चौकशी करावी : जरांगे पाटील

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

छगन भुजबळांना मंत्री पदावरून हटवून गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. पिस्तुलाची भाषा बोलून भुजबळ मराठा आंदोलकांना बदनाम करत आहेत.. त्यामुळे मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी त्यांची चौकशी करावी अन्यथा ते दोघेही टारगेटवर असतील, असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.



मनोज जरांगे पाटील म्हणाले की, भुजबळ लईच येडे आहेत. कधी शहाणे होतील काय माहिती. पुढच्या वेळी भुजबळ यांना मंत्रीपद देणार नाहीत त्यामुळे गरज नाही असे म्हणतात बोलत आहेत, आता त्यांच्या नादी लागायचे नाही, अशी टीकाही जरांगे पाटील यांनी यावेळी केली आहे. मराठा आंदोलनादरम्यान बीडमध्ये झालेल्या जाळपोळीमागे जरांगे पाटलांचा हात असल्याचा गंभीर आरोप भुजबळांनी या सभेमधून केला होता. या आरोपांवर आता जरांगे पाटील यांनीही सडेतोड उत्तर देत पुन्हा एकदा भुजबळांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मराठ्यांचा गनिमी कावा कसा असतो हे मुंबईत पहा, त्यांनी कितीही १४४ लावले तरी मराठा समाज मुंबईमध्ये येणारचं. आरक्षण मिळाल्यानंतर आमच्या लोकांना बदनाम करणारे कोण आहेत हे शोधून काढणार आहे,असा इशाराही जरांगेंनी दिला.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिल्या नोटीस : २२७ कर्मचारी हजर

**कामावर हजर होण्यासंदर्भात नोटीस**

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी महिनापासून कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले आहे. या संपात जिल्ह्यातील ३ हजार ५६८ कर्मचारी सहभागी आहेत. दोन दिवसात कामावर हजर व्हावे, या संदर्भात शासनाच्या सूचनानुसार नोटीस बजावण्यात आल्या आहेत. दरम्यान मागील दोन दिवसात २२७ कर्मचारी रुजू झाले आहेत.

अंगणवाडी सेविकांच्या ग्रॅच्युटी बाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा देण्यात यावा, वेतनश्रेणी व ग्रॅच्युटी भविष्य निर्वाह निधी आदी सामाजिक सुरक्षा, सर्व लाभ देण्यात यावे या सह इतर मागण्यासाठी ४ डिसेंबरपासून एक तर ७ डिसेंबरपासून दोन संघटना संपावर गेल्या आहेत. जिल्ह्यातील ३ हजार ५६८ कर्मचारी संपावर उतरले आहेत. महिना भरापासून अंगणवाडीचे संपूर्ण कामकाज ठप्प झाले आहे. सेविका व मदतनीस यांच्या संपामुळे अंगणवाडीच्या विविध



कामकाजावर परिणाम झालेला आहे. बालकांचे पोषण आहार मिळत नाही, गरोदर मातांच्या तपासण्या, लसीकरण अशा सर्वच कामावर परिणाम झालेला आहे. कामाची होत असलेल्या गैरसोय दूर व्हावी या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेविकांना ४८ तासांत कामावर हजर होण्यासंदर्भात नोटीस बुधवारी बजावण्यात आल्या आहेत. नोटीस मिळाल्यानंतर देखील जर अंगणवाडी सेविका कामावर रुजू होणार नसतील तर त्यांच्यावर शासनाच्या नियमाप्रमाणे कारवाईचा इशारा दिला आहे. दरम्यान आतापर्यंत २२७ अंगणवाडी सेविका व मदतनीस कामावर रुजू झालेल्या आहेत. तर अद्यापपर्यंत ३ हजार ३४१ सेविका व मदतनीस यांचा संप सुरुच आहे.जर कर्मचारी कामावर रुजू झाले नाहीत तर शासना पातळीवरुन कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

## 'मॉडीफाय' फंडा चोरीच्या दुचाकीचा तपास करण्याचे पोलिस अधिकाऱ्यासमोर आव्हान

चोरीच्या दुचाकीचा तपास करण्याचे जिल्ह्यातील सर्वच पोलिस ठाण्यातील तपास अधिकार्यासमोर आव्हान आहे. तर, दुसरीकडे चोरीच्या काही दुचाकी 'मॉडीफाय' करून वापरात आणल्या जात आहेत. 'मॉडीफाय' केलेल्या दुचाकी नव्याकोर्या दिसत असल्यामुळे त्याची तपासणी होत नाही. वास्तविक 'मॉडीफाय' दुचाकीची नंबरप्लेट व चेसी नंबर, इंजिन नंबर याची पडताळणी केल्यास दुचाकीचा इतिहास समोर येईल.

जिल्ह्यात दुचाकी चोरीचे प्रमाण गेल्या काही महिन्यांपासून वाढले आहे. किमान दोन तरी दुचाकी दररोज लांबवल्या जातात. चोरीच्या दुचाकी अन्य जिल्ह्यात किंवा राज्यात जाऊन विकल्या जातात. बर्याचदा दुचाकीचे सुटे भाग करून त्याची विक्री होते. दुचाकी चोरीचे प्रकार आणि चोर्या उघडकीस येण्याचे प्रमाण पाहिले तर त्यात मोठी तफावत आहे. त्यामुळे एवढ्या चोरीच्या दुचाकी जातात तरी कोठे? असा प्रश्न पडतो.

सध्या युवा वर्गामध्ये जुन्या दुचाकीला नवी कोरी बनवून ती वापरात आणण्याचे 'फॅड' आहे. त्यासाठी १५ ते २० हजार रुपयांपर्यंत खर्चही केला जातो. जुनी दुचाकी 'मॉडीफाय' करताना अन्य दुचाकींचे सुटे भाग वापरून त्याच्या मूळ आकारात बदल केला जातो. पेट्रोल टाकी, मडगार्ड, हेडलाईट, फायबरचे पार्ट हे वेगवेगळे लावून 'लूक' बदलला जातो. जुनी दुचाकी नसेल, तर बर्याचदा चोरीच्या गुन्ह्यातील दुचाकीचा मूळ साठा वापरला जातो. त्यावर इतर दुचाकींचे पार्ट बसवून आकर्षक बनवली जाते. त्यावर मूळ नंबरप्लेट किंवा दुसरीच कोणती तरी नंबरप्लेट बसवली जाते. चोरीच्या दुचाकी सहजपणे लपवण्यासाठी त्या 'मॉडीफाय' करण्याचा फंडा शोधून काढला आहे. अवघ्या काही हजारांत दुचाकीत बदल करून चोरी पचवली जाते.दुचाकी नव्याकोर्या दिसत असल्यामुळे त्याची तपासणी होत नाही. त्यामुळे 'मॉडीफाय' दुचाकी खरोखरच नियमानुसार बनवली आहे काय? याचा तपास करून कारवाई करण्याची गरज आहे.

**अवैध विक्रीवर हवा वॉच**

**ग्रामीण भागात कमी किमतीत जुन्या दुचाकीची विक्री करणार्या टोळ्या सक्रीय आहेत, पोलीसांनी अशा टोळ्यांचा शोध घेऊन त्यांची चौकशी करणे गरजेचे आहे.अनेकदा बनावट कागदपत्रे तयार तयार करून चोरीच्या दुचाकीची विक्री केली जाते, कमी किमतीत दुचाकी मिळत असल्याने कागद पत्रांशिवाय खरेदी केली जाते. शहरातील व ग्रामीण भागातून विना नंबर प्लेट च्या अनेक दुचाकी जा-ये करतात परंतु पोलीस वाहतूक शाखा याकडे दुर्लक्ष करतेविना नंबर प्लेट दुचाकी स्वाराकडुन शंभर पन्नास रुपये उकळण्याचे काम केले जाते अशी चर्चा शहरात सुरू आहे याकडे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.**

**मॉडीफाय दुचाकीची चौकशी करणे गरजेचे**

**आज शहरात बर्याच 'मॉडीफाय' दुचाकी पळताना दिसतात. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर मूळ दुचाकी कोणती हेच लक्षात येत नाही. अशा बर्याच दुचाकींचा चेस नंबर गायब झालेला असतो. तसेच ही दुचाकी रस्त्यावर फिरताना नवी कोरी असल्याचे पाहून तसेच नंबरप्लेट नियमाप्रमाणे असेल, तर वाहतूक पोलिसही अडवत नाहीत. जरी पोलिसांनी अडवले, तर वाहन परवानाच बघितला जातो. तो असेल तर सोडून दिले जाते.**



**शोध बातमी**
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

## नमो विकासपर्व, तरूणाईला साद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये देशाची धुरा सांभाळल्यापासून आजतागायत त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कालावधीत प्रगतीचा आलेख उंचावतच चालला आहे. मोदींच्या उक्ती आणि कृतीत एकवाक्यता असल्याने त्यांच्यावर टीका करण्याची संधी मागील दहा वर्षांच्या कालावधीत विरोधकांना मिळालीच नाही. पंतप्रधान मोदी शुक्रवारी महाराष्ट्रात विशेषत: मुंबई आणि नाशिकमध्ये विकासकामांच्या उद्घाटनासाठी व लोकार्पणासाठी आले होते. मोदी बोलत नाहीत, तर त्यांची विकासकामे बोलतात हे देशवासीयांनी गेल्या दशकभराच्या कालावधीत जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे. त्यांच्या कृतीतून ते एक वेगळाच संदेश देत असतात, त्या संदेशापासून प्रेरणा मिळत असते. पंतप्रधानपदाची धुरा सांभाळण्याअगोदर मोदींनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदावरून गुजरातचा विकास केला होता. त्यांनी गुजरातमध्ये केलेला विकास जवळून पाहण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक राजकीय घटकांनी त्यावेळी गुजरातचा दौराही केला होता. मनसे सुप्रिमो राज ठाकरे यांनी त्यावेळी गुजरात दौऱ्यावरून आल्यावर मोदींच्या विकासकामांची प्रशंसा करताना महाराष्ट्रातील प्रस्थापितांना त्यापासून बोध घेण्याचेही आवाहन केले होते. मोदींची कार्यप्रणाली पाहता, ते आपल्यावर होत असलेल्या आरोपांची कधी दखल घेत नाहीत. विरोधकांशी शब्दांनी वाद न घालता देशविकासाच्या कृतीतून ते चपराक लगावत असतात. १९१४ पासून भारतीय जनता नरेंद्र मोदींच्या प्रेमात पडलेली आहे. ते प्रेम आजही कायम आहे. मोदींच्या झंझावातापुढे विरोधक निष्प्रभ झाले असल्याने २०१९च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही पक्षाला साधे विरोधी पक्ष नेतेपदही मिळविता आले नाही. जे आजवरच्या पंतप्रधानांना शक्य झाले नाही, ते २२ जानेवारी रोजी प्रभू रामचंद्रांच्या जन्मभूमी असलेल्या अयोध्यानगरीत राम मंदिराचे लोर्कापण होत आहे. महाराष्ट्र दौऱ्यावर आलेल्या मोदी यांनी नाशिकच्या काळाराम मंदिरामध्ये रामाचे केवळ दर्शन घेतले नाही तर त्या मंदिरामध्ये स्वत: स्वच्छताही केली. मोदी आणि त्यांचे स्वच्छता प्रेम ही बाब लपून राहिलेली नाही. स्वच्छतेबाबत मोदींनी सातत्याने आग्रही भूमिका मांडलेली आहे. अन्य राजकीय घटक आले असते आणि दर्शन करून गेले असते. पण मोदींनी तसे केले नाही. हाच तर मोदी व अन्य राजकीय घटकांमध्ये फरक आहे आणि याचमुळे मोदी आजही भारतीयांच्या गळ्यातील ताईत आहेत. नाशिकच्या काळाराम मंदिरात त्यांनी आरती केली, मंदिरात स्वच्छता केली आणि गोदातीरी जाऊन गोदावरीची आरतीही केली. मोदींना देशवासीयांची नस समजली आहे. ते आपल्या भाषणांमधून राजकीय टीका न करता केवळ विकासाची भाषा बोलतात. तरुणाईला मार्गदर्शन करतात. विकासाची आगामी रूपरेषा स्पष्ट करतात. शुक्रवारच्या महाराष्ट्र दौऱ्यातही त्याची पुन्हा एकवार प्रचिती आली. तरुणांनी राजकारणात यावे अशी साद पंतप्रधान मोदी यांनी महाराष्ट्र भेटीदरम्यान केली आहे. राजकारणाची धुरा तरुणाईच्या हाती असल्यास प्रगती साधणे शक्य होते. तरुणाईंने राजकारणात येऊन राजकारणातील ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेतल्यास देशाला कमी वयातच प्रगल्भ व युवा नेतृत्व उपलब्ध होईल. तरुणाईंने सोशल मीडियावर राजकीय भाष्य करणे, आपला उद्रेक व्यक्त करणे यामुळे राजकारणाबाबत तरुणाईचा आकस वाढला आहे. त्यामुळे तरुण स्वत: राजकारणात उतरल्यास त्यांना राजकारण काय असते ते अनुभवता येईल, त्यात सुधारणा करता येईल, त्यासाठी तरुणाईने राजकारणात येणे आवश्यक आहे, ही गोष्ट ओळखून पंतप्रधान मोदी यांनी तरुणांना राजकारणात येण्याचे आवाहन केले आहे. लोकशाहीबाबत अनेक जण वेगवेगळे भाष्य करत असतात. मतदानाचा कमी होत चाललेला टक्का ही लोकशाहीसाठी चिंताजनक बाब आहे. मतदान करण्याची उदासीनता असलेल्यांना लोकशाहीबाबत बोलण्याचा काही अधिकारच नाही. मतदानाबाबतच नाहीतर मतदार नोंदणीबाबतही भारताच्या युवकांमध्ये अलीकडच्या काळात उदासीनता पाहावयास मिळत आहे. त्यामुळे हाच धागा पकडत पंतप्रधान मोदी यांनी आज आपल्या भाषणात नवमतदारांनी सर्वप्रथम आपली मतदार म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. मतदार नोंदणी झाली तरच त्यांना मतदानाचा अधिकार मिळणार आहे. मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यावरच त्यांना आपला लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार प्राप्त होणार आहे.

# तिळगूळ घ्या, गोड गोड बोला...

अशी संक्रांत साजिरी, तिळ-गुळाचा हलवा
हळदी-कुंकवाचे वाण, माझ्या संस्कृतीचा ठेवा!

माझं बालपण ग्रामीण भागातील नगर जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात गेलं. त्यामुळे ग्रामीण भागातील सण-उत्सव हे माझ्या मनात बालवयात रुजले. त्यापैकीच माझा सर्वात आवडता सण म्हणजे संक्रांत. शेती व्यवसायाशी आणि ऋतुमानाशी निगडित असलेले सण आपण त्या त्या पद्धतीने साजरे करतो. संक्रांत हा सण १४ किंवा १५ जानेवारीला येतो. कारण त्या वेळेत सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. उत्तरायण सुरू होतं आणि शेत धनधान्याने फळाफुलांनी भरलेले असते. त्यामुळे संक्रांतीला सूर्यपूजेचं विशेष महत्त्व आहे. भारतामध्ये अनेक ठिकाणी अनेक प्रकारे संक्रांत साजरी करतात. दिल्ली आणि हरयाणामध्ये मकर संक्रांतीला 'सक्रात', म्हणतात, तर मध्य प्रदेशात 'सुकरत' आणि राजस्थानमध्ये 'सक्रात' असे म्हटले जाते. काही ठिकाणी जत्रा, मेले भरतात. काही ठिकाणी पतंग उडवून संक्रांत साजरी करतात, तर काही ठिकाणी नाच, गाणे, नृत्य करून संक्रांत साजरी केली जाते. हा सण सूर्यदेवाच्या पूजेला विशेष महत्त्व आहे आणि तिळ आणि गुळापासून वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ बनवून त्याचा नैवेद्य केला जातो. तो सर्वांना वाटून 'तिळगूळ घ्या, गोड बोला' असं म्हटलं जातं. ग्रामीण भागामध्ये संक्रांत कशी साजरी केली जाते ती मी आज तुम्हाला सांगणार आहे.

गावात आमचा मोठा चौकाचा चिरेबंदी वाडा होता. वाड्याच्या आजूबाजूला अनेक घरं होती. संक्रांत पुढे चार-आठ दिवस राहिली की, ब्राह्मण संक्रांत सांगायला वाड्यात कधी येणार ते आधी सांगायचा. त्याप्रमाणे गल्लीतल्या बायकांना निरोप गेलेले असायचे. तो शक्यतो संध्याकाळच्या वेळेला यायचा, कारण दिवसभर स्त्रिया शेतात कामाला गेलेल्या असायच्या. दाराच्या समोर मोठा ओटा होता. त्या ओट्यावर आजी मोठी सतरंजी अंथरायला सांगायची. त्यावर भटजीबुवा मांडी घालून बसायचे. मग हळूहळू गल्लीतील बायका जमा व्हायच्या. ब्राह्मणाला देण्यासाठी एका ताटामध्ये तीळ, तांदूळ, गूळ घेऊन त्या यायच्या आणि ओट्यावर सतरंजीच्या बाजूला बसायच्या. मग भटजीबुवा पिशवीतून पंचांग काढायचे आणि संक्रांत कोणती वस्त्र नेसली आहे, कोणत्या दिशेला चालवली आहे, कशावर बसली आहे असं सर्व काही सांगायचे. त्याचप्रमाणे पूजेचा मुहूर्त कधी आणि कोणत्या रंगाचे कपडे स्त्रियांनी त्या दिवशी घालायचे हेही आवर्जून सांगायचे. सर्व बायका मनोभावे संक्रांत ऐकायच्या आणि ब्राह्मणाच्या पाया पडून त्यांना बरोबर आणलेला शिधा द्यायच्या. हे झालं की, त्यांची आपापसात चर्चा चालायची. 'सुगडं कधी आणायची बाजाराला जाताना मला बोलव गं!' असं आवर्जून सांगायच्या. बाजाराच्या दिवशी आजीबरोबर मी मुद्दाम बाजाराला जायची, कारण नवीन कपडे, बांगड्या, मेंदी, नेलपेंट, टिकल्याचं पाकीट असं बरंच काही घ्यायचं असायचं.



संक्रांत हा स्त्रियांचा सण समजला जातो. त्यामुळे वर्षातून एकदा प्रत्येक संक्रांतीला आईला आणि काकूला नवीन साडी चोळी गावातील दुकानातून आजी आणायची. कासार बांगड्या घेऊन यायचा नि सर्व बायका संक्रांतीला नवीन चुडा भरायच्या. मग सर्व बायका मिळून शेजारच्या गावी जाऊन कुंभाराकडून मातीची सुगडं आणायची. त्याला संक्रांतीला सुगडंच का म्हणतात? हा मला नेहमी पडलेला प्रश्न. नंतर मला कोणीतरी सांगितलं, सुघटचा अपभ्रंश होऊन सुगड हा शब्द झाला असावा. आधीच सुगडं आणून देवघराच्या ओट्याखाली सांभाळून ठेवायची. सुगड पडून फुटलं की अपशकुन होतो, असा समज असे.

संक्रांतीच्या आदल्या दिवशी भोगी असल्यामुळे त्या दिवशी त्या ऋतूत येणाऱ्या सर्व भाज्यांची मिक्स भाजी केली जाते. त्यामध्ये तिळ, शेंगदाणे, खोबरं अशा स्निग्ध पदार्थाचाही वापर करतात कारण, संक्रांती हिवाळ्यामध्ये आलेली असते. या ऋतूमध्ये गहू, ज्वारी हुरड्यात आलेली असते. ओला हरभरा, गाभुळलेली बोरं, ऊस, भुईमुगाच्या शेंगा, गाजर, वांगी, वालाच्या शेंगा, पेरू अशी मिक्स भाजी बाजरीच्या तिळ लावलेल्या भाकरी आणि खिचडी हिरव्या मिरचीचा ठेचा हे सर्व पाहूनच तोंडाला पाणी सुटायचं आणि भरपूर ताव मारायचा. संक्रांतीच्या दिवशी सकाळी आई तिळ वाटून त्यामध्ये हळद आणि बेसन मिसळून त्याचे उटणं बनवायची आणि ते अंगाला लावून गरम पाण्याने अंघोळ घालायची. कारण हिवाळ्यात त्वचा कोरडी होते. सकाळी लवकर काकू आई उठायच्या आणि आम्हाला उठेपर्यंत घरदार झाडून, पुसून स्वच्छ व्हायचं. अंगणभर शेणाचा सडा टाकून त्यावर सूर्याची रांगोळी काढायची. देवघराच्या समोर पाटावर सुगडं ठेवून त्यामध्ये धनधान्याचं प्रतीक म्हणून त्यात हरभरा, गाजर, ऊस, तीळ, शेंगदाणे, बोरं, तिळगूळ हे साहित्य भरलं जायचं. सुगडावर हळदी कुंकाच्या रेषा ओढून ती छान सजवायची आणि धान्याच्या राशीवर ठेवायची. जी धरणी माता वर्षभर शेतामध्ये भरपूर धनधान्य देते तिची कृतज्ञता मानण्यासाठी तिच्या मातीने बनवलेल्या घटाची ही पूजा स्त्रिया अतिशय श्रद्धेने आजही करतात. पुरणपोळीचा स्वयंपाक आटोपून सकाळी दहा-अकराच्या सुमारास गल्लीतील सर्व बायका नवीन लुगडी नेसून हातात एका ताटामध्ये पदराखाली झाकून वाण-ववसा घेऊन मंदिरात जायच्या. मंदिरात पूजा केली की, एकमेकांना हळदीकुंकू लावायच्या आणि गुलालाने भांग भरायच्या. त्यांच्यासाठी हा आनंदाचा सोहळा असायचा. सर्व मंदिरातून जाऊन येईपर्यंत दुपार उलटून जायची, तोपर्यंत त्यांनी अन्नग्रहण केलेले नसायचे.

जात्यावर दळताना आई संक्रांतीच्या ओव्या म्हणायची

चिरेबंदी वाड्यात जमल्या आया-बाया

ववसाया निघाल्या नंदेसंगं भावजया

वाड्यात चौकाच्या चारही बाजूंनी मोठं मोठ्या खोल्या आणि चौकात मोठे दोन रांजण रोवलेले. पडवीत चुली असायच्या. एकाच वाड्यात तीन-चार कुटुंबं गुण्यागोविंदाने नांदत होती. बाहेर मोठं अंगण आणि वाड्याच्या समोर लांबलचक चिरेबंदी, दगडाने बांधलेला मोठा ओटा होता. यासाठी वर्णन केलं याचं कारण असं, अनेक सणउत्सव त्या अंगणात ओट्यावर साजरे व्हायचे. संक्रांतीच्या दिवशी वाड्यातल्या बायकांची लगबग सुरू असायची. संध्याकाळी हळदीकुंकवाचा कार्यक्रम असायचा. चुलीवर हंडाभर चहाचं आधण ठेवलेलं असायचं. चहा घेताना एकमेकींना म्हणायचं नाव घ्या गं मग लांबलचक उखाणे सुरू व्हायचे ते ऐकताना काय मौज याची म्हणून सांगू! ज्या मुलींची लग्न जमलेली असत, त्यांना त्यांच्या सासरकडून नवीन साडी, बांगड्या, मेकअपचे सामान, तिळाचे लाडू अशा प्रकारे भरगच्च सामान यायचं आणि ते पाहण्यासाठी आजूबाजूच्या सर्व बायकांना बोलावलं जायचं. ती एक वेगळीच उत्सुकता असायची. एकमेकींना हळदीकुंकू लावताना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहायचा. कोणाच्या पायात चांदीची नवीन जोडवी तर कोणाच्या गळ्यात नवीन मंगळसूत्र दिसायचं. नवीन साडी नेसलेल्या बायका लक्ष्मीसारख्या दिसायच्या. बदलत्या काळाबरोबर ग्रामीण भागातही बरेच बदल झाले असले तरी अजूनही संक्रांत पारंपरिक पद्धतीने साजरी करतात; परंतु गावातील सर्व मंडळी शेतामध्ये वस्तीवर राहायला गेल्यामुळे तो वाड्यातला अनुभव अनुभवायला येत नाही. तरीही बायकांचा उत्साह तोच जाणवतो. अशा प्रकारे संक्रांत आज परत शब्दांकन करताना त्या लहानपणीच्या दिवसांत घेऊन गेली आणि तो सर्व आनंद पुन्हा अनुभवायला मिळाला.

असे म्हणतात प्रेमाने जग जिंकता येते. जिथे सर्व शस्त्रांचा प्रभाव संपतो तिथे प्रेमाचे शस्त्र कामी येते. श्रीकृष्णानेही गीतेमध्ये प्रेमाची महती वर्णिली आहे. आपल्या संपूर्ण अवतारकार्यातही भगवंताने प्रेमाचे महत्व आपल्या वर्तणुकीतून प्रसंगांतून दाखवून दिले आहे. भारतीय हिंदू संस्कृतीने तर प्राणिमात्रापासून अगदी निर्जीव वस्तुवरही प्रेम करायला शिकवले आहे. अशा या प्रेमाची शिकवण देणारा वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. तिळगुळाच्या माध्यमातून प्रेमाची देवाणघेवाण करण्यास शिकविणारी मकरसंक्रांत भारतीय संस्कृतीचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो म्हणजेच सूर्याचे उत्तरायण सुरु होते. हा काळ अत्यंत शुभ मानला जातो. शरपंजरी पहुडलेल्या पितामह भीष्मांनीही प्राण त्यागण्यासाठी उत्तरायण सुरु होण्याची वाट पाहिली होती. हिंदू धर्मातील हा एकमेव सण आहे जो शालिवाहन वर्षानुसार साजरा न करता सौर कालगणनेनुसार साजरा केला जातो.

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने या सणाला शेतीविषयक महत्वही आहे. आपल्या शेतात आलेले धान्य या दिवशी सुवासिनी स्त्रिया एकमेकींना वाण म्हणून देतात. याचेच रूपांतर आता हळदी कुंकू समारंभात झाले असून शहरी भागांत स्त्रिया वेगवेगळ्या वस्तू वाण म्हणून देतात. लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांना तिळगुळाच्या लाडूप्रमाणे प्रेमाच्या नात्यात घट्ट बांधण्याची प्रेरणा देणारा हा सण स्नेहाचे आणि प्रेमाचे आगळे महत्व सांगून जातो. एकमेकांना तिळगुळ देताना 'आमचा तिळगुळ सांडू नका, आमच्याशी भांडू नका' असे बजावून वर्षभर परस्परांशी स्नेहाने वागण्याचा जणू करारच या दिवशी केला जातो.

## परस्परांतील स्नेह वाढवणारी 'मकर संक्रांत'


आमच्या लहानपणी मोठ्यांना तिळगुळ देऊन त्यांचे शुभाशीर्वाद घेताना पाठीवर पडणारी थाप आम्हा बच्चे कंपनीला वेगळाच आनंद देऊन जाई. तिळगुळ वाटूनही तिळगुळाची वाटी द्रौपदीच्या थालीप्रमाणे भरलेलीच असे. कारण जेव्हढे तिळगुळ दिले जायचे तेव्हढेच पुन्हा वाटीत यायचे. तिळगुळ वाटण्याच्या निमित्ताने जेष्ठ मंडळींकडून होणारे लाड आणि मिळणारे आशीर्वाद आम्हाला ऊर्जा देत असत.

तीळ हे स्निग्ध असतात. स्निग्ध म्हणजेच स्नेह. या स्नेहाचे गुळासोबत मिश्रण करून ते घट्ट केले जाते. एकमेकांतील स्नेहाचे नाते असेच घट्ट राहावे यासाठीच मकर संक्रातीच्या दिवशी प्रतीकात्मक तिळगुळ एकमेकांना दिला जातो. तीळ हे उष्ण असल्याने थंडीच्या दिवसांत शरिरातील उष्णता वाढवण्याचे महत्वाचे कार्य करतात त्यासोबत मिश्र केलेला गुळ स्नेहाच्या नात्यातील गोडवा दिवसागणिक वाढत जाण्याची प्रेरणा देतो. मकर संक्रांतीनंतर रथ सप्तमीपर्यंत स्त्रिया घरोघरी किंवा सार्वजनिक ठिकाणी हळदी कुंकू साजरा करतात. एरव्ही एकमेकांशी भांडणाऱ्या, एकमेकांची उणीधुणी काढणाऱ्या स्त्रिया वर्षभरातील सारे हेवेदावे विसरून हळदी कुंकू साजरा करण्यासाठी एकत्र येतात. एकमेकींना हळद कुंकू लावून परस्परांतील शक्तीचे पूजन करतात. प्रेमाचे प्रतीक म्हणून तिळगुळासोबत वाण देतात. मकर संक्रांत हा सण भारताच्या विविध प्रांतासह नेपाळमध्येही उत्साहाने साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी सण साजरा करण्याच्या पद्धती जरी भिन्न असल्या तरी एकमेकांमध्ये प्रेमाची देवाणघेवाण करणे हाच या सणाचा प्रमुख उद्देश आहे. सध्याच्या धावत्या जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालक आपल्या पाल्यांना इंग्रही माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालू लागली आहेत. कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या आजच्या पिढीवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळतो. प्रेम व्यक्त करण्याचे दिवस आणि साधनेही आज बदलली आहेत. परंपरागत सणांची जागा आज निरनिराळ्या 'डेज'ने घेतली आहे. हातभर रिबिनी बांधून आणि अंगावर पेनाने रंगवून, चॉकलेट आणि गुलाबाची फुले वाटून प्रेम दर्शवणारी नवीन पिढी सर्वत्र पाहायला मिळते आहे. ज्या पिढीमध्ये जेष्ठांसाठी केवळ 'मदर्स डे' आणि 'फादर्स डे' तेव्हढे शिल्लक राहिले आहेत. अशा पिढीला मकरसंक्रांतीतील तिळगुळाचा गोडवा कदाचित कळणारही नाही. त्यांच्यावर आपल्या सणांचे आणि संस्कृतीचे महत्व बिंबवणे आज आवश्यक बनले आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

## शब्दकोडे-२९३



### आडवे शब्द

१. ब्लडप्रेशरला मराठी शब्द ४. आपला-परका असा भेद (भाव) ७. श्वापद, पशू ११. भ्रमंती १३. डवरणे, भरून येणे १४. फणसाचा एक प्रकार १६. पादत्राण १७. देशी दारू १८. पूर्णपणे १९. यांच्यासारखे सख्य म्हणजे पूर्ण वैरच की! २२अ. पेशव्यांची राजधानी २४. खंदक २५. खुंटी, मेख २६. सत्य २९. आजूबाजूला ३०. सांघिक व्यायाम ३२. अनुमती ३४. घोडा ३५. स्वत:च्या नावे कालगणना सुरू करणारा राजा ३७. रोम ३९. कवी बा.भ. बोरकर यांची नादमधुर कविता- 'गडद निळे, गडद निळे --- भरूनि आले' ४१. गुडघ्याखाली येणारा हार ४४. दारूच्या आहारी गेलेला ४६. समाधान पावलेला ४७. दूध वा दूधाचे पदार्थ ४८. थडगे ५०. गुणज्ञ ५२. खवा ५३. बडबड्या ५५. माळ, हार ५७. देह ५९. मज्जाव ६०. पातळ खांब ६२. कपाळभर लावलेले कुंकू ६३. वागणूक ६४. वाईटाचे मंत्रतंत्र ६६. क्षमता, ताकद ६७. धमनी ६९. लक्ष्मी ७१. संताप ७३. बागवान ७४. बासरी ७६. गणपती ७७. किरकोळ सामान

### उभे शब्द

१. चैत्रवमीचा अवतार २. मोठी जाड सुई ३. लट, परंतु (इंग्रजी) ४. आमिरचे बंबईय्या भाषेतील पर्यटनगीत!-'-- क्या खंडाला? ५. प्रचीती, अनुभव ६. बासुंदीपेक्षा हल्ली ही लोकप्रिय ७. स्त्रियांसाठी पूर्वी वापरले जाणारे विशेषण ८. धातूचे चलन ९. झाडाच्या चिकापासून मिळणारा चिवट पदार्थ १०. अळूच्या भाजीत ही पालेभाजी हवीच! १२. उबग, सुस्ती १५. उपवासाचा कंद १८. ही उपाधी मिरवण्यासाठी पुण्यात केवळ वास्तव्य असणे पुरेसे नाही! १९. विकासपथावर असलेला २०. नको त्या गोष्टीत नाक खुपसणारी २१. कालच्या आधीचा दिवस २२. 'स्वामी'कार रणजित देसाईंच्या पत्नी माधवी देसाई यांचे आत्म कथन- '-- गं घुमा' २३. गाईचे पिल्लू २५. पाप २७. तमाशातील प्रश्नोत्तरे २८. ही टाकणे म्हणजे पड २९. ध्वनी ३१. यश देणारे ३३. आश्चर्य ३६. रवाळ ३८. सतत तक्रार करणारा ४०. करूणा, कीव ४१. अंगमेहनत करून निर्वाह करणारा ४२. घराणे ४३. हस्त ४५. तात्पुरते रुसणे ४७. पणजीचे राज्य ४८. वेदनेची तिडीक ४९. जीभ ५१. दार ५२. आत्या ५४. एक पालेभाजी ५६. श्रीमंत ५७. मंदवासर ५८. छोटा फोड ५९. चितन ६१. उंट हाकणारा ६२. मनाला आलेला थकवा ६५. भडीमार ६८. समतल ७०. तपास, शोध ७२. फक्त, केवळ ७३. चंद्राची कड ७५. घाव, प्रहार

### शब्दकोडे-२९२ चे उत्तर

**आडवे उत्तर** - १.दाब ३.गगनभेदी ८.वास १०.भास १२.हिमालय १४.गरजवंत १६.रानवट १८.पारंगत २०.नाग २१.रासभ २२.हयात २४.वडीलधारी २६.ताई २७.टरफल २९.पाचर ३०.पर ३२.वारस ३३.जननमरण ३५.लस ३७.माई ३८.नीरस ४०.सट ४१.महाल ४२.पडसाद ४३.ऊस ४४.वीर ४५.कप्पा ४६.नरवर ४९.महामाता ५१.होन ५३.कर ५५.चकणा ५६अ.कस ५७.पराक्रम ५९.कलेवर ६१.कलाकार ६३.जाजम ६४.तरु ६५.तापट ६७.काळवीट ६९.दादर ७२.कारभार ७३.समता ७४.कलमदान ७७.हालहवाल ७८.साल ७९.कट ८०.पाटीलकी

**उभे उत्तर** -२.बहिरभट ३.गलत ४.गय ५.भेग ६.दीर ७.सवंगडी ९.सरासरी १०.भाव ११.सटवाई १३.माग १५.जनावर १७.नभ १९.पाया २१.राधा २२.हलवाई २३.तपासनीस २५.लहानसहान २६.तारणहार २८.रजा ३०.परमवीरचक्र ३१.कलप ३४.नट ३६.सड ३७.मादकता ३९.सहायक ४७.रजपज ४८.वीणा ४९.मधुकर ५०.मानवता ५२.नकलाकार ५४.रट्टा ५६.कमतरता ५६ब.सकाळ ५८.रामदास ६०.रपका ६२.रवी ६६.टरफल ६८.टकमक ७०.दमदाटी

## हळदी-कुंकू कार्यक्रमांतील धार्मिकता जोपासा!

हिंदू धर्मातील केवळ एक सण वगळता सर्व सण हे प्राचीन कालगणनेनुसार कोणत्या ना कोणत्या तिथीला येतात. सौर कालगणनेनुसार येणारा एकमेव हिंदू सण म्हणजे मकर संक्रांत. सूर्य या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो म्हणून या दिवसाला मकर संक्रांत असे म्हटले जाते. दरवर्षी मकर संक्रांत १४ जानेवारीला साजरी करण्याचा प्रघात आहे. सुर्यभ्रमणामुळे पडणारे अंतर भरून काढण्यासाठी काही वेळा संक्रांत एक दिवस पुढे ढकलली जाते म्हणजे १५ जानेवारीला असते. यंदाची मकर संक्रात सुद्धा १५ जानेवारीला साजरी केली जाणार आहे. एकमेकांमधील हेवेदावे विसरून तिळगुळ खाऊन गोड बोलण्याचा संदेश देणारा हा सण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच आवडीचा सण आहे. संक्रांतीला हिंदू धर्मात देवता मानले जाते. या देवतेने संकरासुर नावाच्या दैत्याला ठार मारले तो दिवस संक्रांत आणि दुसऱ्या दिवशी किंकरासुराला ठार केले तो दिवस किंक्रांत म्हणून ओळखला जातो. या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरु होते. उत्तरायणात मृत्यू येणे अधिक चांगले समजले जाते. शरशय्येवर ५८ दिवस पडून असलेल्या पितामह भिष्मांनी सुद्धा उत्तरायण सुरु झाल्यानंतर देहत्याग केला. संक्रातीच्या दिवसापासून पुढे रथ सप्तमीपर्यंत घरोघरी हळदी कुंकू घालण्याचा प्रघात आहे. एरव्ही एकमेकांची उणीधुणी काढण्याची एकही संधी न सोडणाऱ्या स्त्रिया शेजार पाजरच्या सुवासिनींना घरी बोलावून त्यांना हळद कुंकू कावतात आणि वाण म्हणून एखादी वस्तू देतात. सुवासिनीच्या रूपात साक्षात देवीचे घरी आगमन झाले आहे या भावाने आलेल्या सुवासिनीला हळद कुंकू लावून तिचे पूजन केले जाते. फुल,गजरा किंवा वेणी देऊन तिला नमस्कार केला जातो. तिला वाण दिले जाते. वाण देणे हे त्यागाचे प्रतीक आहे. घरी आलेल्या दुर्गारूपी सुवासिनीच्या पूजनानंतर तिला तन मन धन समर्पित करत आहोत या भावाने प्रतीकात्मक वस्तू म्हणून वाण दिले जाते. गेल्या काही वर्षांपासून हळदी कुंकूचे कार्यक्रम सार्वजनिक रीत्याही साजरे केले जाऊ लागले आहेत. हौसिंग सोसायट्या, सार्वजनिक उत्सव मंडळे, महिला बचत गट, मंदिर समित्या, राजकीय पक्ष, संघटना यांच्यावतीने प्रतिवर्षी हळदी कुंकूचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यानिमित्ताने काहीनाकाही वस्तू वाण म्हणून दिली जाते. बजेट ठरवून वाण म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये बऱ्याचदा फण्या, प्लास्टिकचे डबे, प्लॅस्टिकच्या डिशेश, स्टीलच्या वाट्या, चमचे, साबण, साबणघर यांसारख्या असात्त्विक वस्तू दिल्या जातात. सुवासिनीला हळद कुंकू लावताना आदिशक्ती म्हणून तिचे पूजन केले जाते अशा आदिशक्तीला असात्त्विक वस्तू वाण म्हणून देणे अयोग्य आहे. हळदी कुंकू हा धार्मिक कार्यक्रम असल्याने वाण म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तूही सात्त्विक असायला हव्यात. उदबत्या, उटणे, कापूर, वाती, पोथी, देवतांच्या कथा आदी सात्त्विक वस्तू भेट म्हणून द्याव्यात.

- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

### आजपासून तीन दिवस मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**धुळे ।** नाशिकची निरोगी आयुष्य कडे वाटचाल करण्यासाठी म्हणून इंडिकेट डायग्नोस्टिक सेंटरच्या वतीने १५ ते १८ जानेवारी दरम्यान वाहतूक पोलिसांसाठी मोफत आरोग्य शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालयाच्या वतीने जितेश मुनोत यांनी दिली. नाशिक शहरातील महाकवी कालिदास कला मंदिरात शेजारी असलेल्या भेंडीची डायग्नोस्टिक सेंटर प्रायव्हेट लिमिटेड द्वारा नाशिकची निरोगी आयुष्याकडे वाटचाल व्हावी यासाठी पोलीस उपयुक्त चंद्रकांत खांडवी वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली या डायनोसिक सेंटरमध्ये सोमवार दिनांक १५ ते १८ जानेवारी दरम्यान वाहतूक पोलिसांसाठी स्वतंत्र असे आरोग्य तपासणी शिबिर घेतले जाणार आहे या शिबिरामध्ये सर्व तपासण्या केल्या जाणारा असून योग्य असे मार्गदर्शन देखील त्यांना केले जाणार आहे.

# मोदी हेच उमेदवार आहेत असे समजून कामाला लागा

### महायुती नाशिक जिल्हा कार्यकर्ता मेळाव्यात आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथे महायुती जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळावा डेमोक्रॉसी बँक्वेट हॉल, त्रंबकरोड, सातपूर, नाशिक येथे संपन्न झाला. यावेळी जिल्हाभरातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, आर.पी.आय (अ), पी.आर.पी, ब.वी.आ, जे.एस.एस, आर.एस.पी, पी.जे.पी., स्वाभिमान, रयत क्रांती संघटना, भीमसेन, ब.री.एकता मंच, आर.पी.आय (खरात गट), शिवसंग्राम पक्षाचे महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच उमेदवार आहेत असे समजून सर्वांनी कामाला लागा असेही आवाहन यावेळी करण्यात आले.







**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उमेदवार आहेत, तसेच प्रत्येक कार्यकर्ता उमेदवार आहे असे समजून आपापसातील मतभेद विसरून कामाला लागण्याच्या सूचना केली. काही अंतर्गत मतभेद असतील त्यावर देखील तोडगा काढण्यात येईल. येणाऱ्या निवडणुकीत महायुतीचा विजय १०० टक्के निश्चित आहे. सरकारने केलेले कार्य जनतेत पोहचविण्यासाठी सर्व यंत्रणा राबविण्याचे आवाहन करण्यात आले असून विरोधकांना कामाने उत्तर देण्यात येईल.**
**- दादाजी भुसे, पालकमंत्री, नाशिक.**

महायुतीच्या या मेळाव्यात पालकमंत्री दादाजी भुसे, केंदीय मंत्री डॉ.भारती पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आ. दिलीप बनकर, आ. सुहास कांदे, आ. देवयानी फरांदे, नाशिक लोकसभा निरीक्षक जयंत साठे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार, आर.पी.आय. जिल्हाप्रमुख प्रकाश लोंढे, गणेश उन्हावणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर मेळाव्याचे सूत्रसंचालन शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी केले. प्रास्ताविक लक्ष्मण सावजी यांनी तर आभार प्रदर्शन रंजन ठाकरे यांनी केले.

आगामी लोकसभेच्या निवडणुकीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उमेदवार आहेत, तसेच प्रत्येक कार्यकर्ता उमेदवार आहे असे समजून कामाला लागण्याचे आवाहन पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले. येणाऱ्या काळात नाशिक कायम कसे स्वच्छ राहील यासाठी प्रयत्नशील राहून प्रत्येकाने आपले कर्तव्य म्हणून जबाबदारी घेण्याचे आवाहनही ना. भुसे यांनी केले.

आपापसातील मतभेद विसरून कामाला लागा, महायुती हा आपला ब्रँड आहे, हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. जगात भारताची मान अभिमानाने उंचावत आहे, हा भारताचा सन्मान असून पंतप्रधान मोदी यांच्यामुळेच आपण स्वाभिमानाने जगात वावरतोय. जनतेत जाताना सरकारने केलेले कार्य पोहचवा, शेतकऱ्यांसाठी देखील खूप चांगले निर्णय घेतले आहेत. त्याचा प्रचार प्रसार करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी उपस्थितांना केला.

या महायुतीच्या मेळाव्यात महायुती नाशिक जिल्हा समन्वयक म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, राष्ट्रवादीचे आ. दिलीप बनकर, भाजपचे जिल्हा समन्वयक आ. राहुल ढिकले यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली.

या मेळाव्यास खा. हेमंत गोडसे, आ. राहुल ढिकले, आ. सिमा हिरे, माजी महापौर रंजना भानसी, बाळासाहेब सानप, चंद्रकांत (राजू आण्णा) लवटे, अनिल ढिकले, भाऊलाल तांबडे, संजय दुसाने, प्रशांत जाधव, प्रविण तिदमे, विजय साने, दिनकर पाटील, दिलीप खैरे, गणेश कदम, पूजा वाघ, मंगला भास्कर, सुवर्णा मटाले, प्रेरणा बलकवडे, अस्मिता देशमाने आदी महायुतीच्या सर्व पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्य सेनानी काम्रेड नरेंद्र मालुसरे यांना हुतात्मा स्मारकात अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**



स्वातंत्र्य सैनिक समिती नाशिकच्या वतीने हुतात्मा स्मारकात स्वातंत्र्य सेनानी काम्रेड नरेंद्र (नाना) मालुसरे यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक मुकुंद रानडे यांनी केले. त्यांनी नरेंद्र मालुसरे उत्कृष्ट क्रिकेटपटू आणि झुंजार पत्रकार होते. तसेच त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष विजय राऊत यांच्या हस्ते नरेंद्र मालुसरे यांचे वारसदार संजय मालुसरे यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विजय राऊत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, नरेंद्र मालुसरे यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी नरेंद्र मालुसरे यांना अनासक्त कर्मयोगी अशी उपाधी देऊन गौरविले होते. नाना मालुसरे यांचे साधे राहणे व कष्टकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी प्रत्यक्ष संघर्षांपासून तरुणांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. यावेळी किसान सभेचे राज्य नेते सुनील मालुसरे यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला.

## मविप्र मॅरेथॉन स्पर्धेच्या लोगोचे अनावरण

**नाशिक ।** रविवार दि.२८ जानेवारी रोजी होणाऱ्या ८ व्या राष्ट्रीय व १३ व्या राज्यस्तरीय नाशिक मविप्र मॅरेथॉन स्पर्धेच्या लोगोचे अनावरण काल गुरुवार दि. ११ रोजी आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, आंतरराष्ट्रीय कोच विजेंद्रसिंग, नाशिक जिमखाना प्रमुख नरेंद्र छाजेड, नाशिक क्रिकेट असोसिएशनचे विनोद शहा, अविनाश खैरनार, मॅरेथॉन आयोजन समितीचे अध्यक्ष व संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, महेश तुंगार, मविप्र संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, डॉ. डी. डी. लोखंडे, डॉ. विलास देशमुख, प्रा. दौलत जाधव, संस्थेचे क्रीडा अधिकारी प्रा. हेमंत पाटील यांच्या उपस्थितीत मविप्र संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात करण्यात आले.

## पालकमंत्र्यांची राष्ट्रीय युवा महोत्सवाला उपस्थिती

**नाशिक । प्रतिनिधी**




नाशिक येथे सुरू असलेल्या २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी कालिदास कलामंदिरात नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे हे उपस्थित होते. यावेळी उपस्थित सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्यात. यावेळी मंत्री भुसे म्हणाले की, युवा हा देशाची ताकद अभिमान आणि स्वाभिमान आहे. युवा महोत्सवाच्या निमित्ताने आज तरुणाईचा कुंभमेळा मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे.

नाशिक शहरात सुरू असलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी देशभरातून हजारो विद्यार्थी नाशिक शहरात दाखल झाले आहेत. चार दिवस सुरू असलेल्या या युवा महोत्सवासाठी वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम सुरू आहेत. मंत्री भुसे यांनी कालिदास कलामंदिर तसेच उदोजी मराठा हायस्कूल येथे भेट दिली. मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांमध्ये बसून सहभागी विद्यार्थ्यांचे अविष्कार यावेळी बघितले. यात महाराष्ट्राची लावणी तसेच पंजाब राज्याचे भांगडा नृत्याविषकार यावेळी बघितला.

उदाजी मराठा हायस्कूल येथे सुरू असलेल्या पोस्टर प्रेझेंटेशन येथे त्यांनी भेट दिली. यावेळी शिवसेना जिल्हाध्यक्ष अजय बोरस्ते, क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## जातपंचायत विरोधी कायदा देशभर लागू करावा

**नाशिक । प्रतिनिधी**


महाराष्ट्र सरकारने जातपंचायतच्या मनमानी विरोधात कायदा बनविला आहे. जातपंचायतचे अस्तित्व संपुर्ण देशभर असल्याने असा कायदा देशभर लागू करावा, अशी मागणी अंनिसच्या जातपंचायत मूठमाती अभियानाचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली आहे. तशा आशयाचे निवेदन त्यांनी पंतप्रधानांना दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच नाशिक दौरा केला. यावेळेस त्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, जातपंचायत ही समांतर न्याय व्यवस्था आहे. ती पुर्वीपासून चालत आली आहे. कधी काळी देश पारतंत्र्यात असतांना तीची अवश्यकता होती. परंतु देश स्वातंत्र्य झाल्यावर आपण लोकशाही स्विकारली आहे. त्यामुळे जातपंचायतचे स्वयंघोषित न्यायनिवाडे हे लोकशाही विरोधी आहे. ते लोकशाहीला कमकुवत करतात.

## लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी कै. शंकर बोऱ्हाडे कुटुंबीयांशी साधला संवाद

**नाशिक । प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांना शेकोटी साहित्य संमेलनाच्या वतीने दिला जाणारा यंदाचा कै. डॉ. शंकर बो-हाडे लोककला पुरस्कार जाहीर झाला असून त्यांनी या पुरस्कार व शेकोटी साहित्य सम्मेलनाच्या पार्श्वभूमीवर कै. शंकर बो-हाडे यांच्या निवासस्थानी भेट देत कै शंकर बो-हाडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत बो-हाडे कुटुंबीयांशी संवाद साधला.



यावेळी नाशिकरोड शिवजन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत करुन नाशिकरोड शिवजन्मोत्सव सोहळ्याची माहिती देवून त्यांना आमंत्रण दिले.

यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी नाशिकच्या रसिक प्रेक्षकांची कलावंत म्हणून मला नेहमी भरभरुन साथ लाभली असून नटरंगी नार सारख्या कार्यक्रमातून नाशिककरांनी ते दाखवून दिल्याची आठवण करून देत तमाम नाशिककर प्रेक्षकांचे आभार मानले आहेत. याशिवाय आपण नाशिक शहरात लवकरच एक नृत्य अकादमी सुरू करणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे. या नृत्य अकादमीतून युवा कलावंतांना विशेषतः गोरगरीब मुलींना कथ्थक, भरतनाट्यम व विविध वाद्यसंगीतासह सर्व प्रकारचे शिक्षण, प्रशिक्षण देण्यात येईल, त्यांना चित्रपट सृष्टीत कलावंत म्हणून स्वतः सिद्ध करून दाखवता येईल. यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे भविष्यात लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांच्या नाशिक मधील अकादमीच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील आणखी काही कलावंत लवकरच चित्रपट सृष्टीत झळकतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे. कलावंतांना आतापासूनच या अकादमीच्या सुरू होण्याचे वेध लागले असून भविष्यात त्याला कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

## समता निर्माण व्हावी या हेतूनेच श्रीकृष्णाने केला काला

### डॉ तुळशीराम महाराज गुट्टे ; हनुमान नगर येथे काल्याचे कीर्तन

**नाशिक । प्रतिनिधी**

श्रीकृष्णाच्या बाललीला आनंद देणाऱ्या आहेत. केवळ दुसऱ्यांना आनंद देण्याच्या दृष्टीने भगवान श्रीकृष्णांनी लीला केल्या आहेत. सर्व प्राणीमात्रांचा आत्मा श्रीकृष्ण आहे.भगवान श्रीकृष्ण पूर्ण अवतारी असून, त्यांच्या प्रत्येक लिले मागे अध्यात्म दडलेले असून लीला प्रेरणा दायी आहे. सामाजात समता निर्माण व्हावी या हेतूनेच श्रीकृष्णाने काला केला असल्याचे विचार संत साहित्यांचे अभ्यासक डॉ. तुळसीराम महाराज गुट्टे यांनी केले.




पंचवटीतील अमृतधाम, हनुमान नगर येथील भक्ती महिला भजनी मंडळातर्फे काल्याचे कीर्तन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, श्रीकृष्णाने जो आनंद येशोदेला दिला. तसेच गोपबालक, गोपी, गाई, वासरांना दिला. श्रीकृष्णाने सर्वोदय लीला केल्या आहेत. समाजातील सर्वच स्तरातील लोकांना समान वागणूक मिळावी यासाठी कृष्णाने काला केला. शुद्ध झालेला जीव व परमात्मा या दोघांचे मिलन म्हणजे काला. मानवी जीवनात भगवान श्रीकृष्णांनी ज्या लीला केल्या त्या जीवन जगण्यासाठी प्रेरणादायी आहेत. आपल्या लिलामधून श्रीकृष्णाने गोपींना आपलेपणाचा संदेश दिला.भगवान श्रीकृष्ण परमात्म्यांनी रांगत असताना व गाई चारत असताना केलेल्या चरित्राचे वर्णन करणे हिच काल्याच्या कीर्तनाची मर्यादा आहे. ये दसे चरित्र केले नारायणे!रांगता गोधने राखीताहे या अभंगाचे गुट्टे महाराजांनी विविध दाखले देत निरूपण केले. यावेळी चोपदार नामदेव भोर यांच्यासह भजनी मंडळ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लासलगाव महाविद्यालयात चव्हाण व्याख्यानमाला संपन्न

**लासलगाव । वार्ताहर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे बहि:शाल शिक्षण मंडळ व नूतन विद्या प्रसारक मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्राचार्य डॉ.पी.व्ही.रसाळ यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर गुंफले त्यांनी त्यांच्या व्याख्यानात दैनंदिन जीवनात व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व विशद केले.




दुसरे पुष्प प्रा.राजाराम मुंगसे यांनी 'रसास्वाद' या विषयावर गुंफले.त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात साहित्यातील नऊ रसाचे महत्व विषद केले.तिसरे पुष्प डॉ.सुषमा दुगड यांनी 'हास्ययोग' या विषयावर गुंफले.त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण-तणाव मुक्त जीवन कसे जगावे यावर मार्गदर्शन केले.

या व्याख्यानमालेला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थीत होते.

## जिजाऊंचे विचार राष्ट्राच्या उन्नतीसाठी प्रेरणादायी

### छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक करण गायकर यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या मनात हिंदवी स्वराज्याची प्रेरणा जागवणाऱ्या स्वराज्य जननी माँसाहेब जिजाऊ यांची जयंती म्हणजे आजच्या पिढीला एक विचारांची ऊर्जा प्राप्त करून देणारा दिवस आहे. या हिंदवी स्वराज्याला एक नव्हे तर दोन छत्रपती घडविणाऱ्या माँसाहेब जिजाऊंचे विचार हे राष्ट्रासाठी प्रेरक आहेत. असे प्रतिपादन छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक करण गायकर यांनी केले.

छावा क्रांतिवीर सेनेच्या नाशिक मधील मुंबई नाका परिसरातील मध्यवर्ती कार्यालयात माँसाहेब जिजाऊ जयंतीनिमित्त अभिवादन पर



कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी छावा क्रांतिवीर सेना संस्थापक अध्यक्ष करण गायकर हे आपले विचार मांडताना बोलत होते. ते म्हणाले की, जिजाऊंच्या संस्कारामुळे शिवरायांच्या मनात कर्तुत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाऊंनी त्यांना राजनीती शिकवली, समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिलं, शस्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वतः बारकाईने लक्ष ठेवले, शहाजीराजांची कैद व सुटका, अफजलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगात शिवरायांना जिजाऊंचे मार्गदर्शन लाभले असेही करण गायकर यांनी सांगितले.

यावेळी छावा क्रांतिवीर सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष शिवा तेलंग, केंद्रीय कार्याध्यक्ष विजय वाहुळे, युवा प्रदेश सरचिटणीस नवनाथ शिंदे, नाशिक जिल्हाप्रमुख आशिष हिरे,राज्य उपाध्यक्ष सुभाष गायकर, युवक जिल्हाप्रमुख गिरीश आहेर, आयटी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव दळवी, कामगार आघाडी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिनेश नरवडे, रामकिसन निकम, आयटी जिल्हाप्रमुख शिवम देशमुख, युवक उपजिल्हाप्रमुख प्रशांत सूर्यवंशी, महिला आघाडीच्या दिपाली लोखंडे, निर्मला नालखेडे, अविनाश सूर्यवंशी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## हितवर्धक मंडळातर्फे युवा दिन साजरा

**नाशिक । प्रतिनिधी**

श्री क्षत्रिय अहिर शिंपी समाज मध्यवर्ती संस्था संलग्न हितवर्धक मंडळ यांच्या वतीने शुभलक्ष्मी मंगल कार्यालय येथे राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून राजमाता जिजाऊ भोसले तसेच युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी शिंपी समाज राष्ट्रीय अध्यक्ष वनेश खैरनार, हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष तुषार गवांदे, महिला आघाडी अध्यक्ष सुषमा सावळे, युवक अध्यक्ष रुपेश बागुल, नाशिक जिल्हा महिला अध्यक्ष सीमा शिंपी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी योगेश शिंपी, सुनिता शिंपी, शोभा बोरसे, स्वाती खैरनार, गीता गवांदे, जयश्री मांडगे, सुरेखा निकुंभ, मीना बागुल, आरती खैरनार आदी प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन सचिन बोरसे यांनी तर आभार तुषार गवांदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोकुळ बोरसे, भास्कर बागुल, चंद्रकांत जाधव, गुलाब खैरनार, श्याम निकुंभ, अभिजीत खैरनार, घनश्याम सोनवणे, लीलाधर मांडगे, सतीश निकुंभ, सुनील महाजन, रवी चव्हाण आदी उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### राष्ट्रभाषा सभेतर्फे परीक्षेचे आयोजन

**धुळे ।** महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणेव्दारा राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा दि. २४, २५ फेब्रुवारीला होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत सहभागी व्हायचे असेल त्यांनी २५ जानेवारीच्या आत फॉर्म भरावयाचा आहे. परीक्षेसाठी फॉर्म भरण्यासाठी राष्ट्रभाषा भवन, न्यू सिटी हायस्कूल शेजारी राष्ट्रभाषा हिंदी सभेच्या कार्यालयात सायंकाळी ५ ते ७ दरम्यान संपर्क करावा, असे आवाहन प्रा. जसपालसिंह सिसोदिया यांनी केले आहे. २५ जानेवारीच्या आत फॉर्म भरावयाचा आहे.

### शेतकऱ्याची विषारी द्रव सेवनाने आत्महत्या

**धुळे ।** तालुक्यातील नरव्हाळ गावातील शेतकरी नितीन गुलाबराव देवकर (वय ४६) यांनी राहत्या घरी विषारी द्रव औषध सेवन केले. रात्री हा प्रकार समोर आला. यानंतर त्यांना अत्यावस्थ परिस्थितीत रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी मोहाडी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# धुळे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र सरकारचा मोठ्या प्रमाणात निधी मंजूर : खा.डॉ. सुभाष भामरे

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक योजनांसाठी निधी मंजूर झाला असून या निधीतून सिंचन, रस्ते, भूयारी गटारीची कामे प्रगतीत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ.सुभाष भामरे यांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या शुभारंभ प्रसगी केले.






विकसित भारत संकल्प यात्रेच्या शहरी भागातील दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या उपस्थितीत दत्तमंदिर परिसरात आज झाला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, विकसित भारत संकल्प यात्रेचे नोडल ऑफिसर तथा मुंबई बंदर प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आदेश तितरमारे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त संगिता नांदुरकर, पल्लवी शिरसाठ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, तहसिलदार (संजय गाधी) श्री.पाटील, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, माजी महापौर जयश्री अहिरराव, माजी नगरसेवक अनिल नागमोते, भारती माळी, हिरामण अप्पा गवळी आदी उपस्थित होते.

खासदार डॉ.सुभाष भामरे म्हणाले की, धुळे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक योजनांसाठी अमृत १ व अमृत २ मध्ये निधी मंजूर झाल्याने शहरातील अनेक महत्वाचे प्रश्न यातुन सोडविले जात आहे. यापूर्वी धुळे शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी हे दहा बारा दिवसांनी मिळत होते. ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने अमृत एक योजनेमधून १६२ कोटी रुपये पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी आणि भुयारी गटारीसाठी १५० कोटी मंजूर केले आहे आणि त्यानिधीच्या माध्यमातून जवळपास सर्व कामे पुर्ण झाली आहेत. अमृत योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ७०० कोटी आणि १५० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. आज धुळे शहरासासाठी अक्कलपाडा योजनेमार्फत दोन दिवसांनी पाणी मिळत आहे. येणाऱ्या काळात एक दिवसाआड धुळेकरांना पाणी मिळणार आहे. आणि भविष्यात कधीही धुळे शहराला पाणी टंचाईची होणार नाही असे कामे झालीत आहेत. धुळे शहरातील १८ डीपी रस्त्यासाठी जवळपास १०० कोटी रुपये मंजूर झाले असून १५ डिपी रस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच लहान रस्त्यासाठी जवळपास १०० कोटीचा निधी मंजूर झालेला आहे. गरीबांसाठी केंद्र सरकारने अनेक योजना राबविल्या आहे. या विविध योजनांचा लाभ गरीब, वंचित, दुर्बल घटकापर्यंत पोहचावा यासाठी या विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाने आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून ५० कोटी जनतेला आयुष्मान कार्ड देण्याचे उद्दिष्ट आहे. धुळे शहरात जवळपास ९१ हजार आयुष्मान कार्डाचे वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यात अजूनही ज्या लाभार्थ्यांनी आयुष्यमान भारत कार्ड काढलेले नाही, त्यामुळे या यात्रेच्या माध्यमातून ज्यांना हे कार्ड मिळाले नाही त्यांची नोंदणी करुन ते तयार करुन घ्यावेत. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना, पीएम स्वनिधी योजना, विश्र्वकर्मा योजना सारख्या योजनांचा ज्यांनी लाभ घेतला नसेल त्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



## शिरपूर मर्चंट बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. मनोज महाजन तर उपाध्यक्षपदी रामदास पुरी

**होळनांथे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिरपूर येथील दि शिरपूर मर्चट बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत एकाच पॅनलमधून निवडणूक लढविलेल्या संचालकांनी मात्र अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी स्वतंत्र अर्ज दाखल केल्याने अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता असतांना सदर निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली.

दि शिरपूर मर्चंट बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच संपन्न झाली. त्यात सहकार पॅनलचे १५ पैकी ११ उमेदवारांचा विजय झाल्याने सहकार पॅनलने बहुमत सिद्ध केले आहे. या दिनांक १२ जानेवारी रोजी झालेल्या अध्यक्ष उपाध्यक्ष निवडणुकीत चक्क एकाच पॅनल मध्ये विजयी झालेल्या नवनिर्वाचित संचालकांनी अध्यक्ष- उपाध्यक्ष पदासाठी एकमेकांविरुद्ध उमेदवारी केली यात अध्यक्षपदी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. मनोज उत्तमराव महाजन तर उपाध्यक्षपदी रामदास दामू पुरी यांनी विजयी संपादन केला. त्यांनी अनुक्रमे बँकेचे माजी अध्यक्ष किरण दलाल व संदीप देवरे यांचा पराभव केला.

सदर निवडणूक प्रक्रियेसाठी मनोज चौधरी यांना डी. एम. दुसाने, वीरकर, अमोल एंडाईत, शाखाधिकारी संजय कुलकर्णी यांनी मदत केली. संचालक मनोज अग्रवाल, सुनील अग्रवाल, अनिल कटारिया, भरतकुमार गुजराथी, गुणवंत जैन, राजेंद्र पंडित, राहुल सोनार, कल्पना महाजन, सविता पुरी, गुलाब भोई, यशवंत वाघ, माजी अध्यक्ष डिगंबर माळी, डॉ. उत्तमराव महाजन, ड. अमित जैन, पिंटू माळी, हर्षल अग्रवाल, राजेश भावसार आदींची उपस्थिती होती.

## दोंडाईचाची सिद्धी जैन सीए परीक्षा उत्तीर्ण

**दोंडाईचा । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

दोंडाईचा मुख्यालय असलेल्या व राज्यभर कार्यविस्तारासोबत नावलौकिक प्राप्त दि हस्ती को - ऑप. बँकेचे आधारस्तंभ स्व. कांतीलालजी जैन आणि सुप्रसिद्ध दानशूर व्यक्तीमत्व व उद्योजक स्व. शांतीलालजी जैन यांची नात; व हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज तसेच हस्ती बँक विद्यमान अध्यक्ष कैलास जैन, हस्ती स्कूल संचालिका शितल जैन यांची कन्या सिध्दी जैन ही नुकतेच सीए च्या निकालात उत्कृष्ट गुणांसह उत्तीर्ण झाली.



या यशाचे श्रेय तिने आपल्या क्लासेस चे सर्व मार्गदर्शक सीए सार्थक जैन, सीए यशवंत मंगल, सीए भंवर बोराना, सीए संजय सराफ, सीए शुभम केसवानी, सीए शुभम सिंघल, सीए सुबोध शाह, सीए अमित ताथेड़, एकत्वम अकेडमी, तसेच तिच्या पुणे येथील आर्टिकलशिपचे ऑफिस प्रमुख सीए आशीष खंडेलवाल, प्रा पांडुरंग कागणे, प्रा दिलीप वाघेला, सीए मनीश लूणावत, सीए संतोष नानकानी आणि तिचा मित्रांना अरिहंत मेहता, संकेत माहेश्र्वरी जे नुकतेच तिचासोबत पहिल्याच प्रयत्नात सीए झाले आहे, यांना दिले आहे.

### शेत बांधाच्या कारणावरून चाकूने वार

**धुळे ।** शिरपूर तालुक्यातील भामेर गावाच्या शिवारात शेत बांधाच्या कारणावरून वाद झाला. या वादातून सुनील भगवान पाटील (वय ४९) यांना किशोर मगन पाटील, मगन लखा पाटील, यमुबाई मगन पाटील, प्रतिभा किशोर पाटील यांनी मारहाण केली. तसेच चाकूने वार करून जखमी केले. या प्रकरणी थाळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आदिवासी परिवर्तन मेळावा व नियोजन बैठक संपन्न

**शिंदखेडा । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

तालुक्यातील शिष्ट मंडळ यांनी आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावीत, खा.हिना गावीत यांच्याशी शिंदखेडा तालुक्यातील आदिवासी बांधव यांना आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत योजनाचे लाभ मिळावे अशी मागणी करण्यात आली. त्या मागणीचा विचार करून शिंदखेडा शहरात मेळावा संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी उपस्थित गुलाब सोनवणे, किशोर ठाकरे, रवी जाधव, मंसाराम मालचे, रवींद्र चव्हाण, विष्णू इशी, प्रकाश सोनवणे, युवराज पवार, लक्ष्मण ईशी, रामभाऊ गायकवाड, सतिलाल सोनवणे, रवींद्र ठाकरे, दादाभाऊ सोनवणे, दीपक पवार, ज्ञानेश्र्वर मोरे, वासुदेव ठाकरे, भाऊसाहेब मालचे, मच्छिंद्र शिंदे, रामनाथ धनगरी, कृष्णा मालचे, भगवान पिंपळे, अजय पवार, विजय ठाकरे, विजय मालचे, विष्णू फुल पगारे,गणेश पवार, विठ्ठल सोनवणे,राजू सोनवणे, आशिष पवार, भरत मोरे, बापू महाराज, ईश्र्वर सोनवणे, अजय पवार, पंकज फुले, शिवराम सोनवणे, जिभाऊ भवरे, अभिमन मालचे, गौतम सोनवणे, श्यामसिंग सोनवणे, आप्पा सोनवणे, श्यामभाऊ सोनवणे, महेंद्र भिल, शानाभाऊ सोनवणे, दीपक फुले, सुमित मालचे, भिका बोरसे व सर्व आदिवासी बांधव उपस्थित होते.

## वालीबेन मंडोरे यांच्या प्रभागात 'हर घर मंगल तोरण' अभियान

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

अयोध्येत २२ जानेवारीला प्रभू श्रीराम मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. त्या पार्श्र्वभूमीवर शहरातील मंडोरे प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवा उद्योजक चेतन मंडोरे यांनी हर घर मंगल तोरण अभियान सुरु केले आहे. श्रीमती वालीबेन मंडोरे यांच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे.




युवा उद्योजक मंडोरे यांच्या संकल्पनेतून हर घर तोरण अभियानाचा शुभारंभ भाजपाचे महामंत्री विजय चौधरी, खासदार डॉ. सुभाष भामरे, आमदार जयकुमार रावल,जिल्हा बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे, युवानेते अविष्कार भुसे, भाजपाचे विधानसभा क्षेत्रप्रमुख अनुप अग्रवाल, भाजपा शहर-जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, जिल्हा परिषद अध्यक्ष धरती देवरे, माजी महापौर जयश्री अहिरराव, डॉ. माधुरी बाफना, प्रशांत मोराणकर, योगीराज मराठे, जितेंद्र चौवटिया, हिरामण गवळी, शीतल नवले, विजय जाधव, राकेश कुलेवार, वीरेंद्रसिंग गिरासे, अँड. किशोर जाधव, भाजपा महिला जिल्हाध्यक्षा वैशाली शिरसाट, मोहिनी धात्रक, नेहा अहिरराव, आकाश परदेशी, राजू कोठावदे, संतोष शर्मा, मनोज गर्दे, अतुल पाटील, हेमंत पाटील, अँड. समीर पंडित, पंकज धात्रक, सुहास अंपळकर यांच्या हस्ते या अभियानाला सुरवात झाली. त्यापूर्वी शहरातील खंडेराव मंदिरात मान्यवरांनी पूजा केली. मंदिराला तोरण चढवून या मंगल कार्याचा प्रारंभ केला.

### स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**धुळे ।** राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उप जिल्हा निवडणुक अधिकारी अरविंद अंतुर्लीकर,उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, महेश जमदाडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी मुकेश कांबळे,नायब तहसीलदार पंकज पाटील, प्रवणी बागुल, श्री.सोनार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## पाटील कला महाविद्यालयात भूगोल दिन साजरा

**दहिवेल । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील उत्तमराव पाटील महाविद्यालय दादासाहेब माणिकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय येथे भूगोल दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ सुरेश अहिरे होते. तर प्रमुख वक्ते प्रा डॉ संजय भदाणे होते. त्यांनी भौगोलिक अंधश्रद्धा यावर मार्गदर्शन केले.

यामध्ये ग्रह तारे व स्वर्ग,नरक विषयीच्या भ्रामक कल्पना असून भूगोल शास्त्र आहे. आणि त्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास झाला पाहिजे असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा डॉ सुरेश अहिरे यांनी भूगोल शास्त्र हे मूळ विज्ञान आहे आणि त्याचा सखोल अभ्यास झाला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रा गणेश बच्छाव यांनी केले. यावेळी भूगोल दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी,प्रा जे सी अहिरे,प्रा डी एम पाटील, प्रा बागुल,प्रा एन पी खैरनार,प्रा मंगेश भामरे,प्रा डॉ महेंद्र बोरसे,प्रा बी सी घरटे,प्रा डॉ एस एन संदनशिव,प्रा आय यु शेख,प्रा पी एच जाधव,प्रा डॉ वाय जे कोरडे,प्रा शिवप्रसाद शेवाळे,उपस्थित होते.

## माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत महावाचन उत्सवाचा शुभारंभ

**पिंपळनेर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, त्यातून सामाजिक उन्नती व त्यातून राष्ट्राचा उत्कर्ष या प्रक्रियेचा पाया म्हणजे समृद्ध वाचन होय. वाचन हे एक महत्त्वाचे मूलभूत कौशल्य आहे. त्यातून वाचनाचे महत्त्व आपल्या जीवनासाठी किती महत्त्वाचे आहे हे सांगितले. प्रा.पी.आर. खैरनार, प्रा. पी.जी. पाटील, प्रा.जे.ए.गांगुर्डे, प्रा. के.आर.जैन,श्री प्रा. पी.एस. शंखपाळ,श्री एस.एस.मोहिते,श्री एस.बी.बहिरम यावेळी उपस्थित होते.

## राज्य क्रीडा दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमाचे आयोजन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्राचे महान खेळाडू व स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव यांचे क्रीडाक्षेत्रातील अतुलनीय योगदान विचारात घेता व त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या राज्य क्रीडा दिनानिमित्त धुळे जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

राज्य क्रीडा दिनी जिल्ह्यातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित व स्वयं अर्थसहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, शासनमान्य खाजगी विद्यापीठ, एकविध क्रीडा संस्था, असोसिएशन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, संस्था, मंडळे यानीही पुढील कार्यक्रमाचे आयोजन करुन राज्य क्रीडा दिन साजरा करावयाचा आहे.

तरी राज्य क्रीडा दिनात जास्तीत जास्त विद्यार्थी, खेळांडू व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे यांनी केले आहे.



## विद्यार्थ्यांनी घेतली नायलॉन मांजा न वापरण्याची शपथ

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्रामध्ये मकरसंक्रातीला पतंग उडविण्याचे प्रमाण जास्त असते. यासाठी नायलॉन मांजा मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नायलॉन मांजा न वापरण्याची शहरातील बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. दरवर्षी संक्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

यावेळी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात पतंग उडवतात. यासाठी बंदी असलेल्या नायलॉन मांजाचा वापर केला जात असतो. यामूळे अनेक पशूपक्षींना इजा होत असते, ते जखमी होतात पर्यायाने पर्यावरणाचा र्हास होत असतो. पक्ष्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. तसेच वृत्तपत्र व टि. व्ही. मध्ये याप्रसंगी अनेक अपघात होतांना आपण पाहत असतो. विद्यार्थ्यांना या गोष्टीची कल्पना देत तसेच याचे दुष्परिणाम लक्षात आणून देत याबाबत जनजागृती करण्याची गरज असल्याचे पटवून देण्यात आले. पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी, पशुपक्षी व प्राणी यांच्या जीवाचा धोका टाळण्यासाठी जनजागृती करणे आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे म्हणून याची दक्षता घेऊन बापूसाहेब डी. डी. विसपुते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये नायलॉन मांजा न वापरण्याची शपथ घेण्यात आली. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री पी. बी. पाटील, एस. आर. पाटील, डी. डी. पवार, ए. के. पाटील, एस. बी. भदाणे, अपर्णा पाटील, विजय देसले, महेंद्र बाविस्कर, योगेंद्र पाटील, महेश पाटील, राजश्री मासुळे, जयेश गाळणकर, कुणाल साळुंखे, आंतरवासीता मिनाक्षी सोनवणे, महेश पवार व विलास भामरे यांनी मेहनत घेतली.

## आधुनिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण काळाची गरज : तहसीलदार महेंद्र माळी

### वरवाडे येथे बाल आनंद मेळावा

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

वरवाडे येथे आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा व शाळा नुतनीकरण उद्धटान सोहळा संपन्न झाला. यावेळी तहसीलदार महेंद्र माळी, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सीईओ डॉ.उमेश शर्मा, माजी उपनगराध्यक्ष काशिनाथ माळी, माजी उपनगराध्यक्ष वासुदेव देवरे, विठ्ठल पाटील, संतोष माळी, दगा अर्जुन माळी, युवराज माळी, मंगा माळी, भटू माळी, भालेराव माळी, वसंत माळी, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही. पाटील, सीए अनुप शिंपी, अभियंता पद्माकर शिरसाठ, हेमराज पाटील, अमोल परब, सी.डी.पाटील, मनोज पाटील उपस्थित होते.



बालआनंद मेळावाचे उद्घाटन वरवाडे परिसरातील ज्येष्ठ नागरिक विठ्ठल बोटकू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. आधुनिक संगणीकृत शिक्षणासह व्यावसायिक कौशल्य रूजवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन तहसीलदार महेंद्र माळी यांनी अध्यक्षीय भाषणात करून आनंद मेळाव्यात सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी म्हणाले, माजी शालेय शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुक्यात शिक्षणाचे मोठे जाळे तयार झाले असून जागतिक दर्जाचा विद्यार्थी तयार व्हावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. वरवाडे शाळेत देखील सर्व सोयी सुविधा आपण पुरविल्या असून, हाय स्पीड इंटरनेट सह अत्याधुनिक संगणक कक्ष विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आला आहे. वरवाडे, अंबिका नगर, हुडको, बौद्धवाडा, पारधी पुरा व ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना या शाळेचा फायदा होत असल्याचे मत उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी व्यक्त केले. मुख्याध्यापक महेंद्रसिंग परदेशी म्हणाले, व्यावहारिक कौशल्य, खरेदी -विक्री, आकडेमोड हिशेब यातुन मुले घडतील यासाठी आनंद मेळावा घेत घेण्यात येत आहे. शाळा वास्तुचे व मुख्याध्यापक कार्यालय नूतनीकरण उद्धाटन तहसीलदार महेंद्र माळी यांच्या हस्ते, शिक्षक दालन माजी उपनगराध्यक्ष काशिनाथ माळी व संगणक कक्ष माजी उपनगराध्यक्ष वासुदेव देवरे यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने परिसरातील पालक उपस्थित होते. आनंद मेळावासाठी एकूण ७६ स्टॉल होते. सावित्रीबाई फुले जयंती म्हणजे बालिका दिन पंधरवडा निमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक राजश्री सुनील माळी व चेतना सुनील माळी, द्वितीय क्रमांक संध्या बछाव व ध्रुवी पाटील यांनी पटकावला. या वेळी विज्ञान कक्ष, क्टिव्हिटी रूम, वाचन कक्ष असे विविध कक्ष तयार करण्यात आले. सूत्रसंचलन कमलेश महाजन यांनी केले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
सोमवार दि. १५ जानेवारी २०२४




# विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून देशाला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प : खासदार डॉ. भामरे

## शिरुड येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न






















धुळे ।विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी शेवटच्या घटकातील नागरिक, महिला, शेतकरी, युवा यांच्या सर्वांगिण विकासाला प्राधान्य देण्यात येत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी आज शिरुड येथे केले. भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थीपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. या यात्रेचा शुभारंभ आज शिरुड येथे खासदार डॉ. भामरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, विकसित भारत संकल्प यात्रेचे नोडल ऑफिसर तथा मुंबई बंदर प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आदेश तितरमारे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, तहसिलदार अरुण शेवाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पवार, भाऊसाहेब अकलाडे, गणेश मोरे, हेमंत भदाणे, उपसरपंच कलाबाई पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक





# जेबापुर येथे श्रीराम मंदिर अक्षता कलशची मिरवणूक

## ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी

























सामोडे । ।जेबापुर ता साक्री

येथे श्रीराम मंदिर अक्षता कलश ची मिरवणूक व पत्रिका वाटप करतांना साक्री विधानसभा प्रमुख इंजि मोहन सुर्यवंशी व भाजपा सुपर वॉरिअर हेमराज भदाणे, बुथ प्रमुख शरद अहिरराव, सरपंच मधुकर भदाणे, ग्रामसदस्य मगन पवार, लताबाई रावसाहेब भदाणे, जयश्री हेमराज भदाणे, गिताबाई माळचे, भाजपाचे कार्यकर्त राकेश भदाणे, विरेंद्र भदाणे, जितेंद्र भदाणे, पंकज भदाणे, महेंद्र भदाणे,स्वप्नील भदाणे, कल्पेश देवरे, गोल्डी भदाणे, विक्की भदाणे, राजेंद्र अहिरराव, पवन ठाकरे, प्रविण देवरे, संजय भदाणे, गुलाब माळचे व जेष्ठ नागरिक शिवाजी भदाणे, दादाजी देवरे, निंबादी भदाणे, निंबाजी अहिरराव, उत्तमराव भदाणे, भटु दाजभाऊ भदाणे, दिलीप भदाणे, धोंडू भदाणे व गावातील तरुण मोठ्या संख्येन उपस्थित होते.